दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com    संपादक : अजय भांगे    https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शनिवार दि.२८ फेब्रुवारी २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १८४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Saturday 28 Feburary 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 184 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### तिजोरी रिकामी असताना टेंडरचा सुळसुळाट का?

**मुंबई**–एकीकडे शिवभोजन आणि इतर योजना बंद पाडायच्या आणि दुसरीकडे केवळ घोषणांचा पाऊस पाडून जनतेची दिशाभूल करायची, हेच या सरकारचे धोरण आहे, अशा शब्दांत उबाठा गटाचे आमदार सचिन अहिर यांनी महायुती सरकारवर हल्लाबोल केला.सचिन अहिर म्हणाले की, राज्याची ७७ हजार कोटींची कंत्राटदारांची देणी थकलेली असताना नवीन टेंडर कोणासाठी काढले जात आहेत, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. या योजनांची सरसकट घोषणा करण्यात आली त्यासंदर्भात काहीही विचार करण्यात आला नाही, त्यामुळे तीर्थदर्शन योजना, पुजाऱ्यांना मानधन योजना, देवळांना अनुदान देण्याची योजना बंद पडल्या आहेत.सचिन अहिर म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री सर्वांनाच क्लीनचीट देत बसलेले आहेत. चौकशी अहवाल आलेला नसताना मुख्यमंत्री यांचे नाव नाही, याचे आहे असे सांगतात, यामध्ये चौकशी झाली पाहिजे.

# अवैध प्रवासी वाहतूक रोखण्यासाठी उद्यापासून राज्यभर धडक मोहीम; परिवहन मंत्र्यांचे आदेश

## नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर जप्तीची कारवाई

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यभरात फोफावलेल्या अवैध प्रवासी वाहतुकीमुळे सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे विनापरवाना आणि नियमबाह्य प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांविरुद्ध रविवार १ मार्चपासून राज्यव्यापी तीव्र मोहीम राबवण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी दिले. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर जप्तीची कारवाई होण्याची शक्यता आहे.विधान भवनात आयोजित विशेष बैठकीत ते बोलत होते. यावेळी परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अवैध वाहतुकीमुळे केवळ नियमांचे उल्लंघन होत नसून, प्रवाशांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. फिटनेस प्रमाणपत्र, विमा आणि परवाना नसलेली वाहने रस्त्यावर धावणे हे अपघातांना निमंत्रण देणारे आहे, असे सरनाईक यांनी यावेळी स्पष्ट केले.अवैध वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची भरती केली जाते. अशा वाहनांचा विमा नसल्याने अपघात झाल्यास पीडितांना कायदेशीर मदत किंवा नुकसानभरपाई मिळणे दुरापास्त होते. अनेकदा वाहन चालक किंवा मालक पसार होऊन जबाबदारी टाळतात, ज्यामुळे



प्रवाशांचे कुटुंब उघड्यावर पडते, अशी भीती मंत्र्यांनी व्यक्त केली. राज्याची जीवनवाहिनी असलेल्या एसटी महामंडळाला या अवैध वाहतुकीचा मोठा फटका बसत आहे. एसटीसमोर खासगी अवैध वाहतूकदारांनी आर्थिक आव्हान उभे केले आहे. त्यामुळे शासनाच्या तिजोरीवर ताण पडत असून अधिकृत सेवा आर्थिक संकटात सापडल्या आहेत. प्रवासी संख्या घटल्याने अनेक मार्गांवरील एसटी फेऱ्यांच्या नियोजनावर विपरित परिणाम होत असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले. अवैध वाहतुकीमुळे प्रवाशांची कोणतीही नोंद नसते. याचा फायदा घेऊन मानवी तस्करी किंवा लुटमारीसारखे गुन्हे घडू शकतात. तपासाच्या वेळी अशा वाहनांचा तपशील मिळत नसल्याने यंत्रणांपुढे अडथळे निर्माण होतात. त्यामुळे हा सामाजिक सुरक्षेचाही प्रश्न आहे, असे मतही सरनाईक यांनी मांडले. रस्त्यावरील वाहतूक कोंडी, वाढते प्रदूषण आणि बेदरकार ड्रायव्हिंग रोखण्यासाठी मोटार परिवहन विभागाने केवळ दंड न आकारता कठोर कारवाई करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. ऑनलाइन आणि पारदर्शक परवाना प्रक्रिया राबवून कायदेशीर वाहतुकीला प्रोत्साहन देण्यावरही या बैठकीत भर देण्यात आला.

# रावेर तालुक्यातील अजंदा येथील महिलेचा बेपत्ता पोलिसांत तक्रार दाखल

दैनिक वादळ वार्ता

**जळगाव । जितु इंगळे**

अजंदा (ता. रावेर) येथील शोभा रामा बिरपण (वय ४५) या दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी घरातून निघून गेल्यापासून बेपत्ता आहेत. संबंधित महिला काही प्रमाणात मानसिक आजाराने त्रस्त असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली आहे.



कुटुंबीयांनी गाव परिसरासह नातेवाईकांकडे सर्वत्र शोध घेतला; मात्र त्यांचा ठावठिकाणा लागलेला नाही. अखेर हरविल्याची तक्रार रावेर पोलीस ठाणे येथे दाखल करण्यात आली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विशाल पी. जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. संबंधित महिलेबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास त्वरित कुटुंबीयांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.राहुल शोभा बिरपण – ९६६५८ ४१२०० उमेश बिरपण – ९३२५३०३७४० कोणालाही शोभा रामा बिरपण दिसल्यास किंवा माहिती असल्यास वरील क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन कुटुंबीयांनी केले आहे.

# केजमध्ये १ मार्च रोजी महास्वच्छता अभियान

## महाराष्ट्रातील २ हजार स्वच्छता दूत होणार सहभागी

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

: महाराष्ट्रातील प्रसिद्ध डॉ नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान च्या वतीने केज शहरात प्रथमच रविवार दि १ मार्च रोजी सकाळी ७ ते १० या वेळेत ऐतिहासिक महास्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून यावेळी शहरातील सर्व प्रमुख रस्ते, भाग आणि शासकीय कार्यालये यांचा परिसर स्वच्छ करण्यात येणार असल्याचे प्रतिष्ठान च्या वतीने कळविण्यात आले आहे. रविवारी सकाळी ठीक सात वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून एका छोट्या कार्यक्रमाने या मोहिमेस सुरुवात होणार आहे.

केज मध्ये रविवारी पार पडणाऱ्या या स्वच्छता मोहिमेत राज्याच्या वेगवेगळ्या ठिकाणचे दोन हजाराहून अधिक सदस्य सहभागी होणार आहेत. यासाठी लागणारे हातमौजे, झाडू व मास्क इत्यादी स्वच्छता साहित्य प्रतिष्ठान च्या वतीने पुरविण्यात येणार असून केवळ जमा केला जाणारा कचरा उचलण्यासाठी वाहनाची मदत केज नगरपंच्यायत कडून घेतली जाणार आहे. या उपक्रमांतर्गत केज शहारातील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते – डॉ थोरात यांचे हॉस्पिटल, शिक्षक कॉलनी, विठाईपुरम,कामगार नगर, उमरी रोड, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, बालाजी मंदिर, भवानी चौक, मंगळवार पेठ कॉर्नर, कानडी रोड इत्यादी भागात स्वछता केली जाणार आहे.डॉ श्री नानासाहेब




धर्माधिकारी प्रतिष्ठान हे एक अध्यात्मिक प्रतिष्ठान असून या प्रतिष्ठान द्वारे स्वच्छता मोहिमेसह, वृक्षारोपण व संगोपन, महाआरोग्य शिबीरे, दिव्यांगासाठी आवश्यक साहित्य वाटप, कर्ण बधिरासाठी श्रवणयंत्रे वाटप, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, व दुष्काळजन्य परिस्थितीवर मात करण्यासाठी जलस्रोत निर्माण करणे इत्यादी सामाजिक उपक्रम राबविले जातात. या प्रतिष्ठानच्या स्वच्छता मोहिनेची लिमका बुक ऑफ रिकॉर्ड मध्ये नोंद झालेली आहे. या प्रतिष्ठानच्या कार्याची दखल घेऊन डॉ अप्पासाहेब धर्माधिकारी यांना पदमश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. त्यांना महाराष्ट्र सरकारने स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत महाराष्ट्र राज्याचा स्वच्छतादूत म्हणून नेमणूक केलेली आहे. ही मोहीम अधिक यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी केज शहरातील समाजप्रेमी युवक –युवती, विद्यार्थी व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन प्रतिष्ठान च्या वतीने करण्यात आले आहे.

# जालिंदर देशमाने सर यांचे निधन

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील जि.प. माध्यमिक शाळा (मुलांची), माजलगाव अंतर्गत कार्यरत असलेले आदर्श शिक्षक जालिंदर चंद्रभान देशमाने सर यांचे दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी गुरुवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास खाजगी दवाखान्यात दुःखद निधन झाले.



ते शिक्षण क्षेत्रासह सामाजिक व धार्मिक कार्यात सक्रिय आणि सर्वपरिचित व्यक्तिमत्त्व होते.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य दिशा व मार्गदर्शन देण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. शिस्तप्रिय, मनमिळावू आणि विद्यार्थ्यांप्रती तळमळ असलेले शिक्षक म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनामुळे शैक्षणिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांचा अंतिम संस्कार येथील मंगलनाथ स्मशानभूमी, माजलगाव येथे रात्री १० वाजता करण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली–जावई, दोन मुलं–सुना, नातवंडे तसेच भाऊ–बहीण असा मोठा परिवार आहे. देशमाने परिवारास या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो हीच तथागत चरणी प्रार्थना. अंत्यसंस्कारावेळी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आरोग्य व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नायगावात दहावीच्या इंग्रजी पेपरला ९८ टक्के उपस्थिती; ७१ विद्यार्थ्यांची अनुपस्थिती

दैनिक वादळ वार्ता

**नायगाव । हानुमंत चंदनकर**

नायगाव येथील परीक्षक कार्यालय सी यु–१११ अंतर्गत शुक्रवारी घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या इंग्रजी विषयाच्या पेपरला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तालुक्यातील एकूण १३ परीक्षा केंद्रांवर ३ हजार ६५७ विद्यार्थी नोंदणीकृत होते. त्यापैकी ३ हजार ५८६ विद्यार्थी उपस्थित राहिले, तर ७१ विद्यार्थ्यांनी पेपरला दांडी मारली. एकूण उपस्थितीचा टक्का ९८ पेक्षा अधिक राहिल्याने प्रशासनाने समाधान व्यक्त केले आहे.

केंद्रनिहाय आढावा घेतला असता बहुतांश शाळांमध्ये शंभराच्या जवळपास उपस्थिती दिसून आली. काही केंद्रांवर तर अत्यल्प अनुपस्थिती नोंदली गेली. विशेषतः जनता हायस्कूल, यमुनाबाई माध्यमिक विद्यालय आदी प्रमुख केंद्रांवर विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती दिसून आली. विद्यार्थ्यांनी वेळेआधीच केंद्रांवर हजेरी लावून परीक्षेबाबतची गंभीरता दाखवून दिली.

परीक्षा सुरळीत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडाव्यात यासाठी परिरक्षक आनंद रेंनगुंटवार तसेच सहायक एस. डी. पचलिंग यांनी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या होत्या. केंद्रांवर पुरेशी बैठक व्यवस्था, प्रश्नपत्रिकांचे वेळेवर वितरण, तसेच शिक्षक व कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. सर्व केंद्रप्रमुखांनी काटेकोर नियोजन केल्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडली नसल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. काही विद्यार्थ्यांची अनुपस्थिती वैयक्तिक अथवा आरोग्यविषयक कारणांमुळे असल्याचे समोर आले आहे. पालकांनीही विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा केंद्रावर पाठवून सहकार्य केल्याचे दिसून आले.

### सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक–सुरेश पाटील

**गट शिक्षणाधिकारी सुरेश पाटील यांनी सर्व केंद्रप्रमुख, पर्यवेक्षक व शिक्षकांचे सहकार्या बद्दल कौतुक केले. उर्वरित पेपरदेखील याच शिस्तीत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने परीक्षा देऊन उत्तम यश संपादन करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.**

# समता सैनिक प्रशिक्षण शिबीराचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आद. डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर साहेबांच्या आदेशानुसार गांव तिथे शाखा आणी घर तिथे समता सैनिक निर्माण करण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा माजलगाव च्या वतीन सांची बुद्ध विहार डॉ. आंबेडकर भवन येथे शनिवार दि.२८/२/२०२६ ते रविवार दि.१/३/२०२६ या कालावधीत दोन दिवसिय महिला/ पुरुष समता सैनिक दल प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरासाठी प्रशिक्षक म्हणुन समता सैनिक दलाचे मेजरजनरल आद.राजाभाऊ आठवले,आद .डॉ एस व्ही बोबडेसर व महिला प्रशिक्षक आद. प्रतिभाताई वाघमारे हे राहणार आहेत तरी तालुक्यातील धम्म उपासक–उपासिका, युवक –युवती यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित आसणारे समता सैनिक निर्माण करण्यासाठी या शिबीरामध्ये सहभागी व्हॉवे असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे डॉ. भागवत साळवे, मंदाताई साळवे ,तालुका संरक्षण उपाध्यक्ष नितिन डोंगरे, विषाखाताई वाघमारे सह तालुका पदाधिकारी यांच्या कडुन करण्यात येत आहे.

# बीडमध्ये ८ मार्च रोजी रंगणार भव्य ‘महिला मॅरेथॉन’

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही रविवार, दि. ८ मार्च रोजी भव्य ‘महिला मॅरेथॉन’ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ६ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे मान्यवरांच्या हस्ते मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवण्यात येईल. ७ किलोमीटर अंतराच्या या स्पर्धेला याच क्रीडांगणावरून प्रारंभ होऊन नगर रोडमार्गे पुन्हा क्रीडांगणावरच समारोप होणार आहे.स्पर्धा दोन वयोगटांत विभागण्यात आली असून १० ते १८ वर्षे तसेच १८ वर्षांवरील महिलांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांना अनुक्रमे रुपये १५,०००, १०,००० व ७,००० अशी पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. सर्व सहभागी स्पर्धकांना टी–शर्ट, नाश्ता व सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी लहान गटासाठी ५० रुपये तर मोठ्या गटासाठी २०० रुपये नोंदणी शुल्क निश्चित करण्यात आले आहे.या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनी तसेच पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या इच्छुक मुली व महिलांनी शुक्रवार, दि. ६ मार्चपर्यंत आपली नोंदणी करून सहभाग निश्चित करावा. अधिक माहितीसाठी ८७८८५३७३४४ किंवा ८२७५५४२०८२ या क्रमांकावर संपर्क साधावा व मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# संपादकीय

## राष्ट्रपतींच्या भेटीने शेगाव संत नगरीत चैतन्याचे वातावरण

देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नुकतीच बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव या संतनगरीला भेट देऊन श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन देखील घेतले. त्याला निमित्त झाले होते ते शेगाव येथे आयुष मंत्रालय आणि अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांच्यावतीने आयोजित आरोग्य शिबीर आणि आरोग्य परिषदेच्या उद्घाटनाचे. हे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्यासह अनेक मान्यवरही राष्ट्रपतींसोबत या संमेलनासाठी उपस्थित होते.शेगाव हे बुलढाणा जिल्ह्यातील अकोला आणि बुलढाणा या दोन जिल्ह्यांच्या सीमारेषेवर असणारे एक छोटेसे गाव, सध्या शेगाव हा तालुका झाला आहे. एरवी या गावाची लोकसंख्या जेमतेम एक लाखांच्या आसपास असावी. या गावाला खरे महत्त्व प्राप्त झाले आहे ते महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात या परिसरातील करोडो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री संत गजानन महाराज यांच्या समाधीस्थळामुळे. श्री संत गजानन महाराज यांचे वास्तव्य दीर्घकाळ शेगाव येथेच राहिले होते. १९०९ साली त्यांनी शेगाव येथे समाधी घेतली. त्यानंतर तिथे त्यांचे मंदिर उभे झाले आणि आज शेगाव हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे. इथे फक्त भारतातूनच नव्हे तर परदेशातूनही गजानन महाराजांचे भक्त दर्शनाला येत असतात. श्री गजानन महाराज यांनी केलेल्या लोककल्याणकारी कार्याबद्दल तसेच त्यांच्या दैवी चमत्काराबद्दल अनेक कथा इथे सांगितल्या जातात. श्री संत गजानन महाराजांची पोथी देखील आज अनेक कुटुंबांमध्ये नियमित वाचली जाते आणि गावोगावी गजानन महाराजांची मंदिरे देखील उभी राहिलेली आहेत. त्यावरून त्यांचे भक्त किती मोठ्या प्रमाणात आहेत हे दिसून येते.सुरुवातीला इथे फक्त महाराजांची समाधी होती. नंतर मंदिर झाले, आता तिथे चार-पाच मोठे भक्तनिवासही झाले आहेत. त्याशिवाय इतरही सुसज्ज अशी व्यवस्था तिथे निर्माण करण्यात आली आहे. त्यामुळे लाखो भाविक इथे दर्शनाला येत असतात. त्यांची निवासाची व्यवस्था अत्यल्प दरात होत असते, तसेच भोजनादी सेवा देखील इथे होत असते. त्यामुळे हे स्थान कायम गजबजलेलेच असते. शेगाव हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असल्यामुळे सरकारने धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून विकास करायला हवा. तसेच हे गाव मुंबई-कलकत्ता रेल्वे मार्गाजवळ वसलेले आहे. काही ठिकाणी सुधारणांना सुरुवात झाली आहे. एरवी मुंबई-कलकत्ता रेल्वे मार्गावर शेगाव हे स्टेशन फक्त गजानन महाराज भक्तांसाठीच ओळखीचे राहिले. अन्यथा बाकी प्रवाशांसाठी शेगाव रेल्वे स्टेशनवर कचोरी चांगली मिळते म्हणून लोक आठवणीने चौकशी करतात. मात्र आज त्या कचोरीलाही जुनी चव राहिलेली नाही.संत गजानन महाराज संस्थानच्या व्यवस्थापनाने इथे व्यवस्था देखील अत्यंत चोख अशी ठेवलेली आहे. मात्र असे असले तरी आजवर या श्रद्धास्थानाला देशाचे पंतप्रधान किंवा राष्ट्रपती यांनी कधीही भेट दिली नव्हती. पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या काळात ज्यावेळी सोमनाथ मंदिराचे लोकार्पण झाले त्यावेळी राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद लोकार्पणाला जाणार कळल्यावर पंडित नेहरू चांगलेच नाराज झाले होते आणि त्यांनी राजेंद्र प्रसाद यांना सोमनाथला जाण्यासाठी विरोधही केला होता अशी इतिहासात नोंद आहे. एकदा उपराष्ट्रपती भैरोसिंह शेखावत हे इथल्या आनंद सागर प्रकल्पाच्या उद्घाटन समारंभासाठी येऊन गेले होते. त्यावेळी त्यांनी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले होते. त्यानंतर गेल्या २३-२४ वर्षांत द्रौपदी मुर्मु यांनी श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचे प्रयत्न कारणीभूत ठरले. याआधी बुलढाणा जिल्ह्यातील मुकुल वासनिक हे देखील केंद्रीय मंत्री होते. मात्र ते काँग्रेसचे मंत्री असल्यामुळे त्यांनी कधी कोणत्याही अतिविशिष्ट व्यक्तीला शेगावला आणण्याचे प्रयत्न केले नव्हते. तो योग प्रतापराव जाधव यांच्यामुळे आला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू येणार म्हणजे पूर्ण शासकीय यंत्रणा कामाला लागणार हे ओघानेच आले. त्यांच्या या कार्यक्रमासाठी सरकारी यंत्रणेने सुमारे तीन महिने आधीपासून मागे लागून संपूर्ण गाव अगदी चकाचक करून ठेवले. गावात बऱ्याच सुधारणा देखील झाल्या.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू शेगावला आल्या. त्यांनी शेगावला महाराजांच्या समाधीचे दर्शन देखील घेतले. श्री संत गजानन महाराज यांनी लोककल्याणासाठी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले होते. त्यांचा गण गण गणात बोते हा मंत्र सर्व जीवांना समानतेचा संदेश देतो असे राष्ट्रपतींनी यावेळी नमूद केले. पूर्ण मंदिर परिसर त्यांनी न्याहाळला आणि संपूर्ण माहिती घेतली. त्यानंतरच त्या अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाने आयोजित कार्यक्रम स्थळी रवाना झाल्या. यावेळी मुर्मू म्हणाल्या की, देश बलशाली करायचा असेल तर इथले नागरिक निरोगी हवेत आणि त्यासाठी आयुर्वेदच महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. मानवी जीवनात वनौषधी हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे जंगले वाचवणे आणि वनौषधींची मोठ्या प्रमाणात लागवड करून त्याची जपणूक आणि संवर्धन करणे हे गरजेचे असल्याचे नमूद केले. आज औषधी वनस्पतींवरून आयुर्वेदात अनेक औषधे तयार केली जातात. त्यावरही मोठ्या प्रमाणात संशोधन होणे आणि आयुर्वेदाचा मानवी जीवनात जास्तीत जास्त उपयोग करून घेणे गरजेचे असल्याचे राष्ट्रपतींनी सांगितले. आरोग्य मंत्रालय हे देशातील आरोग्यवस्थेवर देखरेख करते आणि नियंत्रण करते. मात्र संशोधनात्मक बाबींकडे त्यांना लक्ष देणे होत नाही. म्हणूनच सरकारने आयुष मंत्रालयाची स्थापना केली. त्यायोगे औषधीविषयक संशोधन केले जाईल आणि प्राचीन भारतीय आरोग्यवस्थेवर संशोधन देखील करता येईल असेही त्यांनी यावेळी नमूद केले. तसेच केंद्राप्रमाणेच प्रत्येक राज्यात आयुष मंत्रालय स्थापन करून त्या त्या राज्यातील आरोग्यविषयक संशोधनांना उत्तेजन कसे देता येईल हा प्रयत्न केला जाणार असल्याचे केंद्रीय आयुष्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितले, तर भारतीय आहार पद्धतीत पूर्वापार औषधी तत्त्वे असलेल्या वनस्पतींचाच वापर होत आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला कधीही आजारपण उद्भवू नये अशी सोय असलेली पारंपरिक ज्ञानावर आधारित आपली जीवनपद्धती होती, याकडे राज्यपाल देवाव्रत आचार्य यांनी लक्ष वेधले. आपल्या आहारात अनावश्यक पदार्थांचा अंतर्भाव झाल्यामुळे आजार वाढल्याचे प्रमाण दिसून आले आहे. त्यामुळे आयुर्वेद जीवन पद्धतीनुसार जीवन जगल्यास आजार कमी होतील, असेही राज्यपालांनी सांगितले. एकूणच राष्ट्रपतींच्या या दौऱ्यामुळे शेगावमध्ये चैतन्य निर्माण झाले होते. हे चैतन्य असेच कायम टिकावे अशी अपेक्षा स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत.

# सातपुडावसीयांच्या साक्षीने पेटली देवाची होळी

## मोरी राही :रात्रभर गुंजला ढोल अन् घुंगरुंचा आवाज

दैनिक वादळ वार्ता
**मोलगी । श्री.रविंद्र वळवी**

अक्कलकुवा तालुक्यातील सातपुड्याच्या पर्वतरांगेत अतिदुर्गम भागात असलेल्या डाबच्या मोरीराहीपाडा येथील देवाची होळी शुक्रवारी पहाटे मोठ्या उत्साहात पेटविण्यात आली.

यावेळी नंदुरबार जिल्ह्यासह गुजरात,मध्य प्रदेश राज्याच्या विविध भागातून आदिवासी बांधव मोरीराही येथील देव होळी साजरी करण्यासाठी उपस्थित होते. गुरुवारी सायंकाळपासून या ठिकाणी बावा, बुध्या, मोरखी, धानका,डोखा यांचे नृत्य सुरु झाले होते. या सांस्कृतिक कार्यक्रमांनंतर पहाटे गाव पुजारांच्या हस्ते विधिवत पूजन करुन देवाची होळी पेटविण्यात आली. डाब (मोरीराही) येथील होळी पेटल्यानंतर आता सातपुड्यातील विविध ठिकाणी होळींना मोठ्या उत्साह पुर्ण वातावरणात सुरुवात झाली आहे.

होळीच्या पाश्वभुमीवर नवस केलेच्या आदिवासी बांधवांकडून पाळणी सुरु करण्यात आली आहे. होळी पर्वात पादत्राणे न घालणे, खाटेवर न बसणे, सत्शील वर्तन ठेवणे, निंदा न



करणे आदी नियम पाळण्यात येत आहेत. आरोग्य चांगले राहो, वरुण राजाची कृपादृष्टी होवो, चांगला पाऊस पडून शेती हिरवीगार होवो, धन,धान्य, वैभव. सुख,शांती,समृद्धी नांदावी यासाठी हा नवस केला जातो.

**देवहोळीनंतर इतर ठिकाणी होळी पेटणार**

डाब (मोरीराहीपाडा) येथील होळी ही देवाने ठरवून दिलेली पहिली होळी अशी धारणा आदिवासी बांधवांमध्ये आहे. या होळीसाठी सातपुड्याच्या दुर्गम भागातील नागरिक डाब येथे गुरुवारीपासून दाखल झाले होते .याहामोगी देवीचे जन्मठिकाण असलेल्या देवगाई येथे दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाली. डाबच्या देवहोळीनंतर वालंबा ,असली, मोलगी, जमाना, ओरपा ,डाब, जामली, भगदरी,भांग्रापाणी तलाई,,सुरवाणी,कुंडल,कात्री ,कालीबेल,खुंटामोडी,सरी, अस्तंभा ,माथाअसली, मांडवी ,उमटी, सल्लीबार ,वेली, मोजरा,रोषमाळ,सिसा, मालपाडा, मुंदलवड, तोडीकुंड, उमरगव्हाण,ओहवा, चिवलउतार, डनेल,डेब्रामाळ, दहेल,पिंपळखुंटा,हुणाखांब, सिंदुरी,साकलीउमर,वाडीबार, वडफळी,मोरखी,मोगरा,माळ, मणिबेली,भगदरी,बोखाडी, बेडाकुंड,बिजरीगव्हाण, खांडबारा,वरखेडी बु.मोख, सिसा,काकरपाटी,पाडली, छापरी,गोरंबा,वलवाल, काकरदा,गौऱ्या,मनवाणी, धनाजे बु. ,तोरणमाळ,चुलवड, निगडी,खडकाले,रोषमाळ खु. राडीकलम,वेलखेडी, त्रिशूल,नंदलवड,कामोद खु.बिजरी,तेलखेडी,राजबर्डी, बिलगाव,उमराणी बु.कात्री,भुषा,घाटली,हातधुई, पिंपळबारी,चिंचकाठी, भुजगांव,भोगवाडे, खामला,सिरसाणी, कुवरखेत,चांदसैली, शेलकुई,खडकला,मालपाडा, काठी यासह ठिकठिकाणी होळी पेटणार आहे. यात जागोजागी मोरखी,बुध्या, बावा ,धानका,डोखा हे गेर नृत्य आदिवासींकडून केले जाणार आहे.

# दिल्ली येथील जागतिक शाश्वत विकास शिखर परिषदेत डॉ.हनुमंत सौदागर यांचा सहभाग

दैनिक वादळ वार्ता
**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

२५ फेब्रुवारी २०२६ रोजी 'द एनर्जी अँड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट' (TERI) च्या जागतिक शाश्वत विकास शिखर परिषदेच्या (WSDS) रौप्य महोत्सवी वर्षाचे नवी दिल्ली येथील ताज पॅलेस येथे तीन दिवसीय शिखर परिषदेचे उद्घाटन केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री श्री. भूपेंद्र यादव यांच्या हस्ते झाले. यावेळी ते म्हणाले 'परिवर्तन' हे केवळ ब्रीदवाक्य न राहता ती एक जागतिक चळवळ बनावी जागरूकतेकडून कृतीकडे आता फक्त प्रश्न समजून घेण्याची वेळ राहिलेली नाही, तर प्रत्यक्ष काम करण्याची वेळ आली आहे.असे आवाहन त्यांनी केले. महाराष्ट्र राज्यातून प्रतिनिधित्व सदस्य म्हणून पर्यावरण अभ्यासक डॉ हनुमंत सौदागर यांनी या शिखर परिषदेत सहभाग नोंदवला. मुंबई येथून डॉ रवी एस कुमार हे सहभागी झाले.या शिखर परिषदेसाठी जगभरातून अभ्यासक उपस्थिती होती. यावर्षीची संकल्पना 'परिवर्तन शाश्वत विकासासाठी दृष्टी, आवाज आणि मूल्ये' अशी होती. ढएठख चे अध्यक्ष नितीन देसाई आणि महासंचालक डॉ. विभा धवन म्हणाले की, आता केवळ जागरूकतेचा काळ संपला असून प्रत्यक्ष 'अंमलबजावणी' आणि 'कृती' करण्याची वेळ आली आहे असे मत व्यक्त केले. हिमालय क्षेत्रातील तंत्रज्ञान, स्टार्टअप्स आणि गुंतवणूकदार यांना एकत्र जोडण्यासाठी हे 'इन्नोव्हेशन मेळावा' प्लॅटफॉर्म लाँच करण्यात आले. आर्चिव्हल पॉकेटबुक शिखर परिषदेच्या गेल्या २५ वर्षांच्या प्रवासाचा आढावा घेणाऱ्या विशेष पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. परिषदेत हवामान वित्तपुरवठा , स्वच्छ ऊर्जा, प्रदूषण निवारण आणि संसाधन सुरक्षा यांसारख्या गंभीर विषयांवर सखोल चर्चा झाली. जागतिक शाश्वत विकास परिषदेस जगभरातून विविध देशाचे प्रतिनिधी भारतातून विविध राज्याचे प्रतिनिधी याबरोबर अभ्यासक ,पर्यावरण प्रेमी यांची उपस्थिती होती. या जागतिक स्तरावरील शिखर परिषदेत सहभागी झाल्याबद्दल डॉ सौदागर यांचे अभिनंदन केले जात आहे.




# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी संजय महाजन यांची निवड!

## पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि समाजहितासाठी उभारणार खंबीर लढा; निवडीनंतर राज्यभरातून होत आहे अभिनंदनाचा वर्षाव

दैनिक वादळ वार्ता
**शिर्डी । प्रतिनिधी**

पत्रकार बांधवांच्या समस्यांना वाचा फोडत त्यांच्या हक्कांसाठी राज्यभरात आक्रमकपणे कार्यरत असणाऱ्या 'राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ' या अग्रगण्य व लढाऊ संघटनेच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी शिर्डीतील ज्येष्ठ पत्रकार श्री. संजय विठ्ठल महाजन यांची नुकतीच अधिकृत निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे संघटनेला एक अभ्यासू, अनुभवी आणि सामाजिक बांधिलकी जपणारे कणखर नेतृत्व लाभले असून, राजकीय, सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातून या निर्णयाचे उत्स्फूर्त स्वागत होत आहे.श्री. संजय विठ्ठल महाजन यांचा सामाजिक क्षेत्रातील प्रदीर्घ दांडगा अनुभव, जनसामान्यांशी असलेली घट्ट नाळ आणि पत्रकारितेशी असलेले त्यांचे जवळचे नाते लक्षात घेऊन, संघटनेच्या राष्ट्रीय व राज्य पातळीवरील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी त्यांच्यावर ही मोठी व महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे. त्यांच्या या निवडीमुळे अहिल्यानगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, जिल्ह्याचा दबदबा राज्य पातळीवर निश्चितच वाढला आहे.



**ही जबाबदारी केवळ पद नव्हे, तर समाजसेवेचे व्रत!**

आपल्या या राज्यस्तरीय निवडीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना श्री. संजय महाजन सर यांनी संघटनेचे सन्माननीय संस्थापक, राष्ट्रीय व राज्य पदाधिकारी तसेच आपले सर्व मार्गदर्शक आणि सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.आपले मनोगत व्यक्त करताना आदरणीय महाजन साहेब अतिशय आत्मविश्वासाने म्हणाले की, राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाने माझ्यावर जो मोठा विश्वास टाकला आहे, तो मी कृतीतून सार्थ ठरवेन. ही जबाबदारी माझ्यासाठी केवळ एक पद नसून, तळागाळातील पत्रकार बांधवांच्या हक्कांसाठी आणि समाजहितासाठी काम करण्याची एक मोठी संधी आहे. आपल्या सर्वांच्या भक्कम सोबतीने आणि आशीर्वादाने संघटनेची वाटचाल अधिक सक्षम, प्रभावी व यशस्वी करण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न राहील.

**सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव:**

मा.श्री. संजय विठ्ठल महाजन यांची राज्य उपाध्यक्षपदी निवड झाल्याची बातमी समजताच शिर्डीसह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल विविध संस्थांचे पदाधिकारी, राजकीय नेते, पत्रकार बांधव आणि ग्रामस्थांनी त्यांचे उत्स्फूर्त अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

# मी स्वयंसिद्ध ही पाककृती स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

तळोजा घोटगावचे प्रसिद्ध उद्योगपती व दानशूर व्यक्तिमत्व विनोदशेठ पाटील यांच्या स्वखर्चातून रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घोटचाळ व मी स्वयंसिद्ध ही पाककृती स्पर्धा या उपक्रमास आर्थिक सहकार्य लाभले.रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घोटचाळ व सदगुरु वामनबाबा माध्यमिक विद्यालय घोट यांच्या संयुक्त विद्यमाने होणार मी स्वयंसिद्ध ही पाककृती स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. घोटगावचे प्रसिद्ध उद्योगपती व दानशूर व्यक्तिमत्त्व विनोदशेठ पाटील यांच्या स्वखर्चातून या उपक्रमास आर्थिक सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि व्यवहारज्ञान विकसित व्हावे, तसेच प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी मिळावी या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत पारंपरिक तसेच आधुनिक, पौष्टिक आणि आकर्षक पाककृती सादर केल्या. काहींनी ग्रामीण चवीचे पदार्थ मांडले, तर काहींनी नाविन्यपूर्ण फ्युजन डिशेस सादर करून परीक्षकांचे लक्ष वेधले. चव, सादरीकरण, स्वच्छता, नावीन्य आणि आत्मविश्वासपूर्ण मांडणी या निकषांवर गुणांकन



करण्यात आले. स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना मेडल, ट्रॉफी व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. विजेत्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि पालकांचा अभिमान हा कार्यक्रमाचा विशेष क्षण ठरला.कार्यक्रमाचे उद्घाटन विनोदशेठ पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी पाककला ही केवळ स्वयंपाक करण्याची कला नसून संयम, नियोजन आणि व्यवस्थापन कौशल्य शिकवणारी जीवनकला असल्याचे सांगितले. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास उंचावला. कार्यक्रमास प्रभाग क्रमांक १ चे नगरसेवक नितेश बाळकृष्ण पाटील, माजी सरपंच हरिदास भाई पाटील, गिरीश पाटील, एकनाथ कोळी, वैभव भोईर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश निघुकर, शिक्षणतज्ज्ञ विठ्ठल भाऊ वाव्हळे, घोटचाळ शाळेच्या मुख्याध्यापिका दिप्ती गावंड मॅडम, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संदेश पाटील सर, सरिता म्हात्रे मॅडम तसेच ग्रामस्थ, शिक्षकवृंद, पालक व महिला-तरुणवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.शाळेसाठी सातत्याने मदतीचा हात देणाऱ्या विनोदशेठ पाटील यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. समाजातील दानशूर व्यक्तींमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा मिळते, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी अमित लांभाते सर यांनी सूत्रसंचालन केले. शिक्षकवृंदांच्या सहकार्याने कार्यक्रम शिस्तबद्ध व यशस्वीरीत्या पार पडला. ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी ठरली असून त्यांच्या उज्ज्वल भविष्याकडे टाकलेले एक सकारात्मक पाऊल मानले जात आहे.

# नियमबाहय मानीकगड करार वारसाना डावलून १, कोटीवर डल्ला मारणारे आनंदराव भारत कोन ?याच्या मुसक्या आवळा

दैनिक वादळ वार्ता
**जिवती । प्रतिनिधी**

गेल्या २००७ पासूनमाणिकगड सिमेंट जमिनीचा वाद सुरू आहे १९८४- ८५ मध्ये प्रचलित शासकीय दरानुसार २४ शेतकऱ्यांना ९ लक्ष ६६हजार ५७२ रुपये गडचांदूर येथील विश्रामगृहावर तत्कालीन उपविभागीय अधिकारी मुजुमदार व देशपांडे या दोन अधिकाऱ्यांनी आपल्या समक्ष दिल्याचे शपथ पत्र व पोच पावती जिल्हाधिकारी तसेच कंपनी व्यवस्थापनाने नागपूर उच्च न्यायालयात तथा मानवाधिकार आयोग मुंबई अनुसूचित जमाती आयोग दिल्ली व राज्य विधानसभेमध्ये पाच वेळा लक्षवेधी व तारांकित प्रश्न द्वारे सभागृहाच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर शासनाकडे दाखल केल्यामुळे. सदर सर्व प्रकरण न्यायालयातून खारीज झाले.असे असताना गेल्या अनेक वर्षांपासून जन सत्याग्रह संघटनेच्या माध्यमातून संविधानिक पद्धतीने रास्ता रोको, आमरण उपोषण, मोर्चा ही आंदोलन एवढेच नव्हे तर दि ८ / ६ / २०१८ ला खाण परिसरामध्ये ४२कुटुंबाचे घरे बांधून त्या ठिकाणी असलेल्या ९०हेक्टर जमिनीवर शेती करण्याला सुरुवात केली. याचा मौका पंचनामा तहसीलदार जिवती मंडळ अधिकारी तलाठी यांनी केला. त्यातून आदिवासींनी उत्पन्न घेऊन कुंटूबाचा उदार निर्वाह केला व तहसिलदार यानी शासनाला अहवाल सादर केला होता २४ आदिवासी च्या ७/ १२मध्ये चुकीच्या पद्धतीने माणिकगड सिमेंट कंपनीचे नाव नोंदविल्यामुळे केशव कुडमेथे भाऊराव किनाके यांनी आक्षेप दाखल करून सदर फेरफार रद्द करण्यास भाग पाडले होते. मात्र, कंपनीने नागपूर खंडपीठात उपरोक्त घरे व शेती करत असलेली जमीन खुली करण्यासाठी म्हणून प्रकरण क्रमांक ४७३२ / १८ दाखल करून आबिद अली, शंकर आत्राम सह इतर लोकांना नोटीस दिले होते. याचे प्रत्युत्तर म्हणून आबिद अली यांनी ड अभय सांबरे, ड अनिल ढवस यांचे मार्फतीने उत्तर दाखल करून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना कंपनीने महसूल अधिकाऱ्यांचे किंवा न्यायालयाचे कोणतेही आदेश नसताना सदर घरे चुनखड्डी खाण गावठाण परिसरातून काढण्यासाठी शकल लढवून ज्या २४ कुटुंबांना हेक्ट १० लाख रुपये व घराची किंमत १लाख दोन नोकऱ्या देण्याची आमिष दाखवून समझोता करार हक्क सोडणी बनावटी कागदपत्राच्या आधारावर तयार केले. मात्र, जे गेल्या वीस पंचवीस वर्षांपूर्वी मूळ शेतमालक मयत असताना त्यांच्या वारसांना डावलून करार पत्र तयार करून बँक खात्यावर पैसे टाकले मात्र, सदर पैशावर डोळा असलेले आनंदराव मेश्राम, भारत आत्राम यांचा मुळीच योगदान नसताना व अनेक ठिकाणी यांच्या विरोधात प्रकरण खारीज निकाल लागले असताना बँक खात्यावर जमा असलेल्या रकमा उचलण्यासाठी एका एका खातेदाराला बँकेत नेऊन रक्कम उचल करून हडप केल्याच्या तक्रारी पोलिसाकडे सादर करण्यात आले. मात्र, आम्ही तुमच्यासाठी मेहनत घेतली म्हणून १५ %टक्के रक्कम आम्हाला द्यावे म्हणून काही शेतकऱ्याकडून लाखो रुपये उचल करून या दोघानी स्वतःची झोली भरण्याचे



काम सुरू केले आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या एक कोटी रुपयांचा लूट झाल्याची तक्रार वारसांनी केलेली आहे तर वर्तमानपत्रात बातम्या येताच व पोलीसात वारसानी तक्रारी देताच एक दबंग व अभ्यासक म्हणून स्वतःला म्हणून घेणारे प्रेस न्यूज टाकून त्यांनी प्रकरणांमध्ये मी स्वतः खर्च केला व उधारीवर वकिलांनी प्रकरण लढले असे म्हणून रक्कमा उकडण्याचे कामकरीत असून बळजबरीने आपल्या मर्जीने कागदपत्रावर व विड्डालवर सह्या घेऊन लूट करीत असल्याचा आरोप वारसांनी केला आहे. उपरोक्त प्रकरणांमध्ये यांची भूमिका संशयास्पद व दिशाभूल करणारी असल्याने यांनी कोणत्या न्यायालयात प्रकरण दाखल केले आयोगांचा निकाल मानवाधिकार आयोगाचा निकाल ९१३ / २०१५पिटीशन चा निकाल सर्व यांच्या विरोधात लागले असताना तसेच विधानसभेच्यासभागृहात दस्तूर खुद मुख्यमंत्री तथा महसूल मंत्री यांनी अनेक वेळा हे प्रकरण निकाली काढले असून सभागृहामध्ये घोषणा केली. असताना विरोधी पक्ष नेते तत्कालीन विजय वड्डेटीवार यांनी यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यां मार्फत अहवाल मागितला होता. त्यामध्ये सुद्धा हेच उत्तर देण्यात आले सर्व प्रभाकर मामुलकर, सुभाष धोटे, संजय धोटे, वामनराव चटप, बाळूभाऊ धानोरकर, आरिफ नसीम खान, डॉ देवराव होळी, किशोर जोरगेवार, एम एम शेख, अमोल मिटकरी, इत्यादींना एकच प्रकारचा अहवाल दिल्यानंतर कंपनीला का म्हणून पैसे व मोबदला देण्याची नामुष्की ओढली हा सर्व प्रकार नियमबाह्य असून १९ आदिवासी कुटुंबांना जमिनीचा मोबदला न देता त्यांच्या जमिनी बडकावल्याच्या शेकडो तक्रारी शासन प्रशासनाकडे प्रलंबित असताना. तसेच तहसिलदार भुमी अभिलेख यांचा अहवाल कंपनी विरोधात व मौक्या नुसार सिमांकन चिन्ह नष्ट झाल्याचा अहवाल दिला असताना त्यावर कंपनी व्यवस्थापन व महसूल प्रशासन गप्प असून कंपनीच्या ताब्यात असलेल्या मान्यतेपेक्षा अधिक जमिनीवर कब्जा असल्यामुळे कंपनी मोजणी करून घेण्यासाठी पुढे धस्तावत नाही. यापूर्वी पालकमंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार असताना त्यांनी संपूर्ण मोजणी करावी व बाम्बेझरी - नोकारी - कुसुंबी येथील कंपनी ताब्यातील संपूर्ण जमिनीची मोजणी करण्याची भूमिका घ्यावी.असे आदेश दिले होते मात्र आजपर्यंत प्रशासनाने तथा कंपनीने कोणतीच भूमिका घेतली नाही व कंपनीचे महाव्यवस्थापक नविन कौशीक यांनी लेखी पत्र दि २६जुन २५ ला देऊन कंपनी मोजणीचे पैसे भरण्यास तयार आहोत परंतु आज पर्यंत पैसे न भरल्यामुळे हा वाद जैसे ते परिस्थितीमध्ये आहे. २४ पैकी अनेक मय्यत असलेल्या वारसांना डावलून करण्यात आलेली प्रक्रिया व यामध्ये दोषी असलेल्या कंपनी व्यवस्थापन तथा महाभाग भारत आनंद दलालांची सखोल चौकशी करावी व आमची झालेली फसवणूक पर्दाफास करावा. अन्यथा आमरण उपोषण सुरू करण्याची वारसांनी भूमिका घेतली आहे या सर्व प्रकरणांमध्ये तातडीने पोलिसांनी चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी अरुण उद्दे, बालाजी जाधव, भगवान कुमरे, मारू आत्राम, भिमराव मरस्कोल्हे, नितिन उद्दे, इत्यादींनी केली आहे.

## निलंगा शहरातील सर्व सार्वजनिक बोर तत्काळ सुरू करा–मुजीब सौदागर



दैनिक वादळ वार्ता
**निलंगा । प्रतिनिधी**

निलंगा शहरातील सर्व सार्वजनिक बोर तात्काळ सुरू करन्याची मागणी एका निवेदनाद्वारे मुख्याधिकारी यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते मुजीब सौदागर यांनी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की निलंगा शहरात रस्त्याचे काम सुरू असल्याचे सांगून आठवड्यात एक वेळा पाणी येत असून तेही अत्यल्प कमी प्रमाणात व कमी वेळासाठी येत असून पाण्याची कमतरता भासत आहे.पुढे कडक उन्हाळा असून पुढच्या मार्च महिन्यात धुलीवंदन,रंगपंचमी,गुढीपाडवा आणि रमजान ईद असून सध्या मुस्लिम समाजातील सर्वात पवित्र मानला जाणारा रमजान महिना सुरू आहे,या सर्व गोष्टी व तसेच येणाऱ्या तांत्रिक अडचणी जसे की, पाईप लाईन फुटणे,मोटार जळणे,पाऊस कमी पडणे, लाईट बिल न भरल्याने कनेक्शन कट अशा अडचणी सांगून येणार नाहीत म्हणून पर्यायी व्यवस्था म्हणून तत्काळ बोअर सुरू करण्याची मागणी समस्त निलंगेकरातर्फे सामाजिक कार्यकर्ते मुजीब सौदागर यांनी केली असून ती पूर्ण नाही झाल्यास रमजान महिन्यानंतर अनिश्चित वेळी समस्त निलंगेकरातर्फे भव्य मोर्चा काढण्यात येईल असा इशारा दिला आहे.

## रुग्णवाहीकेची वाट न पाहाता बिट अंमलदाराने जखमीला नेले रुग्णालयात

### सेनगाव–हिंगोली महामार्गावर अपघात;सुभाष चव्हाण यांची तत्परता ठरली जीवनदायी

दैनिक वादळ वार्ता
**सेनगाव । प्रतिनिधी**

रस्त्यावर रक्तबंबाळ अवस्थेत पडलेला तरुण,डोळ्यासमोर मरणांशी झुंज आणि वेळेची प्रत्येक सेकंद जिवावर बेतणारी घटना.सेनगाव-हिंगोली राष्ट्रीय महामार्गावर दि.२३ फेब्रुवारी सोमवार रोजी सायंकाळी घडलेल्या भीषण भीषण अपघात अशा बिकट परीस्थितीत सेनगाव बिट अंमलदार सुभाष चव्हाण यांनी केवळ पोलीस अधिकारी म्हणुन नव्हे,तर एक संवेदनशील माणुस म्हणुन त्या गंभीर जखमी तरुणाला सेनगाव ग्रामिण रुग्णालयात स्वत:च्या चारचाकी वाहनातुन दाखल केल्याने पोलीस फक्त कायदा नाही,माणुसकीचा आधार आहे.हे या घटनेवरुन पोलीस सुभाष चव्हाण यांनी सिध्द केले.



सेनगाव शहराजवळ हिंदुस्तान पेट्रोल पंप परिसरात एम.एच. ४८ ए.यु. ६४७६ क्रमांकाच्या दुचाकीचा भीषण अपघात झाला. अपघातानंतर नानसी येथील हरी पांडुरंग पोडार हा तरुण रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात तडफडत होता.अनेकांच्या हातपाय गळालेले असताना,माहिती मिळताच सुभाष चव्हाण क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धावले.रुग्णवाहिकेला वेळ लागणार, हे लक्षात येताच त्यांनी कोणताही आदेश,कोणतीही औपचारिकता न पाहता स्वतःच्या चारचाकी वाहनाचे दार उघडले आणि त्या जखमी तरुणाला नागरिकांच्या मदतीने अलगद उचलत ग्रामीण रुग्णालयाकडे धाव घेतली.त्या क्षणी वर्दी नियम बाजुला ठेवून माणुसकी पुढे आली होती.रुग्णालयात दाखल करताना याला काही झालं नाही पाहिजे हेच शब्द त्यांच्या ओठांवर होते,असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. डॉक्टरांनीही वेळीच उपचार मिळाल्यामुळेच तरुणाचा जीव वाचु शकला,असे स्पष्ट केले.या घटनेत नगरसेवक श्रीराम देशमुख,माजी उपनगराध्यक्ष निखिल देशमुख, तसेच नागरिकांनी मोलाचे सहकार्य केले.शिवसेना जिल्हाप्रमुख संदेश देशमुख यांनी रुग्णालयात भेट देत उपचारांची माहिती घेतली.प्राथमिक उपचारानंतर गंभीर दुखापतीमुळे जखमीला हिंगोली येथे रेफर करण्यात आले आहे.आजच्या काळात 'पोलीस म्हणजे फक्त कायदा'अशी धारणा असताना, बिट जमादार सुभाष चव्हाण यांनी सिद्ध केले.पोलीस म्हणजे माणुसकीचा पहिला आधार.सेनगावमध्ये त्यांच्या या धाडसी आणि संवेदनशील कृतीचे सर्वत्र कौतुक होत असुन,ही घटना समाजाला मानवतेचा नवा संदेश देणारी ठरली आहे.

## वाघोलीतील उघड्या डीपी ठरताहेत धोकादायक

दैनिक वादळ वार्ता
**वाघोली । प्रतिनिधी**

वाघोली परिसरात विविध ठिकाणी विद्युत खांबावरील तारा तुटून खाली पडलेल्या व उघड्या असलेल्या डिपी चे वाढते प्रमाण दिसुन येत आहे.वाघोलीतील अनेक विविध भागात उघड्या रोहित्र (डीपी) बॉक्समुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. महावितरण कर्मचारी व अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचे दिसत आहे.विविध वर्दळीच्या ठिकाणच्या अनेक डीपींची झाकणे गायब झाल्याने नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. तक्रारी करूनही महावितरणकडून दुर्लक्ष होत असल्याचे नागरिक सांगत आहेत. पुणे अहिल्यानगर मार्गांवर वाघोली येथील केसनंद चौकात महावितरणच्या डीपी बॉक्सचे दरवाजे उघडे असल्यामुळे येथील रहिवाशांच्या आणि वाहनचालकांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे.विद्युत तारा व उपकरणे स्पष्टपणे दिसत आहेत. त्याने दुर्घटना घडण्याची शक्यता आहे.या महामार्गावर दैनंदिन रहदारी मोठ्या प्रमाणावर आहे. अशा परिस्थितीत डीपी बॉक्स सुरक्षित नसल्याने गंभीर समस्या उद्भवू शकते. महावितरणच्या संबंधित विभागाने त्याची त्वरित दखल घेऊन हे डीपी बॉक्स चे दुरुस्तीचे काम त्वरित करावे व नागरिकांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.




## अश्विनी माळी यांना महात्मा फुले महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्रदान

दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

औसा नगरपरिषद परिषदेचे दिवंगत. उपनगराध्यक्ष दिगंबर हरिभाऊ माळी यांची कन्या सौ अश्विनी शेखर रासकर माळी यांना अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने देण्यात येणारा २०२६ या वर्षाचा महात्मा फुले महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला अश्विनी रासकर माळी यांनी सत्यशोधक चळवळीचे जनक महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचाराचा वारसा जपत सामाजिक शैक्षणिक आणि आर्थिक विकासाच्या क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी केली तसेच दुर्गा वाहिनी राष्ट्र सेविका समिती आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या महिला



आघाडीच्या प्रदेश पदावर कार्य करत असताना चुकीच्या विचाराला बळी पडून धर्मांतरित होणाऱ्या मुलींची सोडवणूक करण्याचे भरीव कार्य केले आहे. या कार्याची दखल घेऊन अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था अहिल्यानगर यांच्या वतीने अश्विनी शेखर रासकर माळी यांना यावर्षीचा महात्मा फुले महाराष्ट्ररत्न पुरस्कार एका भव्यसमारंभामध्ये सन्मानपत्र स्मृतीचिन्ह शाल श्रीफळ देऊन प्रदान करण्यात आला त्यांच्या या पुरस्कार बद्दल आदर्श शिक्षक किशनराव फुलमाळी गुरुजी औसा सोसायटीचे माजी चेअरमन वसंतराव फुटाणे, सुशील कुमार बाजपाई ,अरविंद कुलकर्णी ,माधव सिंह परिहार, दत्तात्रेय माळी, एन. जी.माळी पत्रकार राम कांबळे महात्मा फुले समता परिषदेचे तालुका अध्यक्ष सुधाकर माळी माळी समाजाचे अध्यक्ष सचिन माळी यांनी अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत महात्मा फुले महाराष्ट्र रत्न पुरस्काराबद्दल आश्विनी रासकर माळी यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# चिमुर येथे पत संस्था संचालक व सेवकाचे दोन दिवसीय सहकारी प्रशिक्षण संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**चिमूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणेचे सहकारी शैक्षणिक उपक्रमाअंतर्गत सहकार प्रशिक्षण केंद्र चंद्रपुर जिल्हा उपनिबंधक चंद्रपुर व उपनिबंधक सहकारी संस्था चिमुर च्या वतीने चिमुर तालुक्यातील पतसंस्था संचालक, कर्मचारी, अधिकारी यांचे दोन दिवसीय सहकार प्रशिक्षण संपन्न झाले.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचे निमित्ताने चिमुर येथील राष्ट्रसंत तुकडोजी नागरी सहकारी संस्थेच्या सभागृहात आयोजित दोन दिवसीय सहकार प्रशिक्षणाचे उद्घाटन पत्रकार श्रीहरी सातपुते यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मंचावर सहकार प्रशिक्षण केंद्राचे उपप्राचार्य भारत फलके, जिजाऊ नागरी सहकारी संस्थेचे अध्यक्ष रामभाऊ खंडसिंगे, राष्ट्रसंत तुकडोजी नागरी सहकारी संस्थेचे अध्यक्ष गुरुदास ठाकरे आदि मान्यवर उपस्थित होते.महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे सहकार शिक्षण व



प्रशिक्षणाद्वारे संचालक व कर्मचारी यांच्या माध्यमातुन सहकार चळवळ गतिमान होत आहे. अश्या प्रकारच्या अनेक प्रशिक्षणात गेल्या पंधरा वर्षापासुन आपण सहभागी होत असल्याचे मत पत्रकार श्रीहरी सातपुते यांनी व्यक्त केले. उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष गुरुदास ठाकरे यांनी सदर प्रशिक्षण हे राष्ट्रसंत तुकडोजी नागरी सहकारी संस्थेत आयोजित केल्याबद्दल आयोजकाचे आभार व्यक्त केले. या प्रसंगी नचीकेत शहाने, रामभाऊ खडसिंगे यांनी मार्गदर्शन केले.

दोन दिवसीय प्रशिक्षण पत संस्था संचालक व सेवकांना सहकारी कायदा तरतुदी, आयकर कायदा, पतसंस्था नियमक मंडळ, एन.पी.ए. व्यवस्थापन, संस्थेच्या विविध सभा व सभेचे महत्व, संचालकाचे अधिकार व कर्तव्य, कार्यपद्धती, के. वाय.सी., कर्जवाटप व वसुली, कर्मचारी सेवाशर्ती, कर्जदारांचा विमा, आवर्ती ठेव, सुरक्षा ठेव, बचत खाते, नफ्याचे विनियोग नोंदी,कार्यालयीन व्यवस्थापन व कार्यालयीन दस्ताऐवज आदी विविध विषयांवर उपप्राचार्य भारत फलके व अन्य तज्ञानी मार्गदर्शन केले.

सरकार कायदेशिर सल्लगार ॲड. स्वेता जयस्वाल यांनी सहकार कायदा व कायद्यातील तरतुदी, कायद्यातील पळवाटा व त्यावरील उपाय, कर्ज वसुली, न्यायालयीन कार्यपद्धती अशा विविध विषयावर सविस्तर व समाधानकारक मार्गदर्शन कले. समारोपीय कार्यक्रमाचे मंचावर सहकार प्रशिक्षण केंद्राचे उपप्राचार्य भारत फलके, राष्ट्रसंत तुकडोजी नागरी सहकारी संस्थेचे संचालक तथा पत्रकार सुरेश डांगे उपस्थित होते. संस्थेची प्रगती व विकास करण्यासाठी सातत्याने प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. सहकार क्षेत्रातील स्पर्धेत टिकण्यासाठी प्रत्येक संचालक व कर्मचाऱ्यांनी अध्यावत राहणे आवश्यक असल्याचे मत सुरेश डांगे यांनी आपल्या भाषणातील व्यक्त केले. या प्रसंगी रत्नमाला नागरी सहकारी संस्थेच्या व्यवस्थापक अश्विनी करकाडे, यशस्वी नागरी सह. पतसंस्थेच्या व्यवस्थापक क्षमा शंभरकर, महिला नागरी सह. संस्थेचे व्यवस्थापक संदिप पझोणे, जिजाऊ नागरी सह. संस्थेचे व्यवस्थापक मिलींद जांभुळे यांनी आपल्या मनोगतातुन प्रशिक्षणातील माहिती व प्रशिक्षकांची शिक्षण पद्धती याबाबत समाधान व्यक्त केले. राष्ट्रसंत तुकडोजी नागरी सह. संस्थेचे वसुली अधिकारी तेजराम लांडे यांनी आभार मानले. प्रशिक्षणाला सुमारे साठ संचालक व कर्मचारी उपस्थित होते.

# एसटीतील करोडो-अरबोंचा भ्रष्टाचार थांबवा;महिला व ज्येष्ठांच्या सवलतींना हात लावू नका-नितीन जायभाये

## परिवहन विभाग व राज्य शासनाने चुकीचे आर्थिक धोरण बदलावे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राची व ग्रामिण व्यवस्थेची जीवनवाहिनी असलेल्या राज्य परिवहन महामंडळाबाबत (एसटी) सुरू असलेल्या निर्णय प्रक्रियेवर तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. महिलांचे अर्धे तिकीट आणि ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना दिली जाणारी मोफत प्रवास सुविधा बंद करण्याचा विचार सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते नितीन जायभाये यांनी आक्रमक भूमिका घेत सरकारला थेट इशारा दिला आहे.

एसटी तोट्यात असेल, तर त्याला सामान्य जनता जबाबदार नाही. चुकीची आर्थिक धोरणे, व्यवस्थापनातील त्रुटी आणि मेंटेनन्समधील करोडो-अरबोंचा भ्रष्टाचार हेच खरे कारण आहे. सवलती बंद करून सरकार स्वतःच्या अपयशावर पांघरूण घालत आहे, असा घणाघाती आरोप त्यांनी केला.

एसटी ही केवळ वाहतूक सेवा नसून ग्रामीण महाराष्ट्राचा श्वास असल्याचे सांगत नितीन जायभाये म्हणाले, शेतकरी, कामगार, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक आणि विशेषतः माता-भगिनींचा आधार म्हणजे एसटी. महिलांचे अर्धे तिकीट हे दान नसून त्यांचा हक्क आहे. ते बंद करणे म्हणजे त्यांच्या स्वावलंबनावर घाला घालणे होय. तसेच ७५. वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास हा त्यांचा सन्मान आहे. हा सन्मान हिरावून घेणे म्हणजे त्यांच्या आयुष्यभराच्या कष्टांचा अपमान आहे.

‘सवलती बंद नकोत, भ्रष्टाचार बंद करा!’

जायभाये यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, एसटी तोट्यात असेल तर:
मेंटेनन्समधील भ्रष्टाचारावर लगाम लावा,
रिक्त पदे तात्काळ भरा,
मार्ग नियोजन सुधारून तोट्याच्या फेऱ्या कमी करा,
इंधन खरेदी व वापर धोरण पारदर्शक करा,
पण गरीब, महिला आणि ज्येष्ठांवर गदा आणू नका.

सामाजिक न्यायावर कुठलाही आघात आम्ही सहन करणार नाही. गरज पडल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

लालपरीसाठी तीन ठोस मागण्या

एसटीला अधिक चांगले दिवस आणायचे असतील तर तातडीने खालील निर्णय घ्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली –

१) पारंपारिक लालपरीला प्राधान्य द्या :
नवीन हिरव्या रंगाच्या शिवाई चार्जिंग गाड्या भाडेतत्त्वावर घेण्याचे धोरण थांबवावे. पारंपारिक लालपरी बस खरेदी करून सेवा टिकवावी, जेणेकरून सवलती आणि सुविधा कायम राहतील.

२) NCMC स्मार्ट कार्ड सर्वांसाठी परवडणारे करा :
सध्याची स्मार्ट कार्ड योजना सर्वसामान्य प्रवाशांना परवडणारी नाही. रोज किंवा आठवड्यातून एकदा प्रवास करणाऱ्यांसाठी कमी किमतीत उपलब्ध करून द्यावी.

३) खाजगी बसेसचा वापर त्वरित थांबवा :
विशिष्ट कंपन्यांना फायदा होईल अशा खाजगी तत्त्वावरील बसेसचा वापर बंद करावा. या धोरणामुळे एसटी आर्थिक अडचणीत सापडली असल्याचा आरोप त्यांनी केला.

एसटी वाचवा, महिला सन्मान वाचवा, ज्येष्ठांचा अधिकार वाचवा हे आमचे धोरण आहे. सवलती बंद करण्याचा कोणताही प्रयत्न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा ठाम इशारा नितीन जायभाये यांनी दिला आहे

ग्रामीण महाराष्ट्राच्या जीवनवाहिनीवर घाला घालणारे निर्णय सरकारने त्वरित मागे घ्यावेत, अशी जोरदार मागणी आता सर्व स्तरांतून पुढे येत आहे



# ज्ञानसागर परिवाराकडून अन्विताचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा

दैनिक वादळ वार्ता
**पाथर्डी** । प्रतिनिधी

ज्ञानसागर कोचिंग क्लासेसचे संचालक प्रा. अरुण नेहूल यांच्या परिवाराने आपली कन्या अन्विता हिचा वाढदिवस एका अनोख्या आणि समाजोपयोगी उपक्रमातून साजरा करत सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला. हा वाढदिवस जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिक्षक कॉलनी पाथर्डी येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांसोबत साजरा करण्यात आला.




या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक आदर्श शिक्षक बाबासाहेब जायभाये सर तसेच उत्कृष्ट तंत्रस्नेही शिक्षिका श्रीमती संगीता आव्हाड मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली वाढदिवस साजरा करण्यात आला. पाश्चात्त्य संस्कृतीला फाटा देत भारतीय संस्कृतीनुसार दीपप्रज्वलन व शुभेच्छांच्या वातावरणात वाढदिवस साजरा करण्यात आला.

यावेळी ज्ञानसागर परिवाराकडून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला निरागस आनंद हा या वाढदिवसाची खरी भेट ठरली. मित्रत्व, सामाजिक जाणीव आणि सेवाभाव यांच्या संगमातून हा वाढदिवस अविस्मरणीय ठरला.

जनसेवेच्या या स्तुत्य उपक्रमाचे पाथर्डी तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड साहेब, ज्येष्ठ शिक्षण विस्ताराधिकारी रामनाथ कराड, अनिल भवार साहेब, केंद्रप्रमुख दगडू महांडुळे, बाळासाहेब पोळ, बाबासाहेब वामन, भास्कर बारगजे साहेब, गावचे उपसरपंच आकाश वारे, किशोर चव्हाण, सुनीता जाधव, द्वारका नेहूल, प्रा. जयश्री नेहूल, मनिषा वाघमारे, गायत्री बडे, अनिता तुपे, हौसाबाई पालवे, सोनाली उपाध्ये, सोनाली बावणे, राजश्री जाधव, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अंबादास चव्हाण, अशोक तुपे सर, प्राचार्य राजेंद्र बडे सर, प्रमोद भावसार सर, दिपक राठोड सर, काशिनाथ कारखेले साहेब, भारत ननवरे गुरुजी, अशोक मोहिते तसेच पालक व परिसरातील नागरिकांनी कौतुक केले.

ज्ञानसागर परिवाराच्या या उपक्रमामुळे वाढदिवस साजरा करण्याची एक सकारात्मक व समाजाभिमुख दिशा समाजापुढे आली असून, अशा उपक्रमातून सामाजिक जाणीव वृद्धिंगत होण्यास नक्कीच हातभार लागणार आहे.

### कुरार पोलीस ठाणे च्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजीव तावडे

# ‘एक लाख’ घेताना ए सी बी च्या जाळ्यात केबिनमध्ये ६.३४ लाखांचा साठा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील कुरार पोलीस ठाणे येथे खाकी वर्दीला काळीमा फासणारी धक्कादायक कारवाई उघड झाली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) ने रचलेल्या सापळ्यात वरिष्ठ अधिकाऱ्यांसह दोन पोलिसांना लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. मात्र खरी खळबळ तेव्हा उडाली, जेव्हा केबिनची झाडाझडती घेतली असता तब्बल ६ लाख ३४ हजार रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली.‘तीन लाखांची डील’, दोन लाख आधीच घेतले!माहितीनुसार, एका प्रकरणात गुन्हा दाखल करण्याच्या बदल्यात तक्रारदाराकडून तीन लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती. त्यापैकी दोन लाख रुपये आधीच स्वीकारले गेले होते. उर्वरित एक लाख रुपये देताना सापळा रचण्यात आला आणि त्याच क्षणी ACB च्या पथकाने धाड टाकली.या कारवाईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजिव तावडे आणि पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर जुन्ने यांना अटक करण्यात आली आहे. लाच स्वीकारल्यानंतर केबिनमध्ये झालेल्या झाडाझडतीत मोठी रोकड आढळल्याने संशय अधिक गडद झाला आहे.जप्त रकमेचा स्त्रोत, इतर व्यवहार आणि संभाव्य संगनमत याचा तपास सुरू आहे.



नागरिकांमध्ये संतापाची लाट मुंबईसारख्या महानगरात कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी सांभाळणाऱ्या अधिकाऱ्यांकडूनच लाच मागितली जात असल्याचे समोर आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रक्षकच भक्षक झाले तर सामान्य माणूस न्यायासाठी कुणाकडे जाईल? असा सवाल उपस्थित केला जात आहे.एसीबीकडून स्पष्ट इशारा देण्यात आला आहे की, वर्दीचा गैरवापर करून नागरिकांना वेठीस धरणाऱ्यांना कोणतीही माफी दिली जाणार नाही. या कारवाईमुळे पोलीस दलात खळबळ उडाली असून, पुढील काही दिवसांत आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे

# आज हनेगाव येथे राजेंद्र कांबळे खुडुसकर यांचा भव्य शिवशाहीर कार्यक्रम

दैनिक वादळ वार्ता
**हनेगाव । प्रतिनिधी**

हनेगाव भिमशक्ती सामाजिक संघटना देगलूर आयोजित सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा पार पडत असून या सोहळ्या निमित्त महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिवशाहीर राजेंद्र कांबळे खुडुसकर यांचें आज शुक्रवार दिनांक २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता ग्रामपंचायत कार्यालय समोर हनेगाव येथे आयोजित करण्यात आले आहे.

हे कार्यक्रम गेल्या दोन वर्षांपासून भारतीय जनता पक्षाचे तालुका अध्यक्ष प्रितमजी बाळासाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली भिमशक्ती संघटना तालुका अध्यक्ष किशोरजी आडेकर यांच्या नेतृत्वात केली जात आहे.या कार्यक्रमांचे लाभ घेण्याचे आवाहन सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



# अर्धनग्न अंघोळ करून कृषी प्रशासनाचा केला जाहिर निषेध

दैनिक वादळ वार्ता
**हिमायतनगर । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे पोटा येथील सुमारे ४५ शेतकर्यांनी पंतप्रधान राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत पशु खरेदी करून सुद्धा अनुदान न मिळाल्याने दि.२३फेब्रुवारी रोजी कृषी कार्यालय येथे अमरण उपोषण सुरू केले होते चार दिवस झाले तरीही प्रशासन दखल घेत नसल्याने संतप्त शेतकर्यांनी कार्यालयासमोर अर्धनग्न होऊन अंघोळ करत प्रशासनाचा केला जाहिर निषेध.



केद्र व महाराष्ट्र शासना कडुन शेतकर्यांना पशुधन खरेदीसाठी विविध योजने अंतर्गत हिमायतनगर तालुक्यातील मौजे पोटा येथील ४५ शेतकर्यांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी दि.१८ ऑक्टोबर २०२५ रोजी कळमनुरी तालुक्यातील कामठा फाटा येथे उपविभागीय कृषी अधिकारी,तालुकाकृषी अधिकारी, विमा प्रतिनिधी यांच्या उपस्थितीमध्ये पशुधन खरेदी करून त्याच्या रितसर पावत्या प्रशासनाकडे दिल्यानंतर अनुदान लाभार्थी शेतकर्यांना लाभ मिळत नसल्याने दि.२३ फेब्रुवारी रोजी शेतकर्यांनी कृषी कार्यालय हिमायतनगर येथे अमरण उपोषण सुरू केले होते पण आज रोजी चार दिवस होऊन सुद्धा प्रशासन कुठलीच दखल घेत नसल्याने संतप्त शेतकर्यांनी अर्धनग्न होऊन अंघोळ करत प्रशासनाचा निषेध केला.

# जि.प.प्रा.शाळा एकनाथवाडीचा वार्षिक सांस्कृतिक सोहळा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**पाथर्डी । प्रतिनिधी**

सन २०२५-२६ चा वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम जि.प. प्रा. शाळा एकनाथवाडी येथे अत्यंत उत्साहात आणि आनंददायी वातावरणात पार पडला. कार्यक्रमाला श्री क्षेत्र निरंजन संस्थान एकनाथवाडी येथील महंत ह.भ.प. संतोष महाराज शास्त्री यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच पाथर्डी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदनेने झाली. इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी नृत्य, देशभक्तीपर गीते, गाणी आणि विविध सामाजिक विषयांवरील नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून भारतीय संस्कृतीची विविधता आणि ग्रामीण भागातील प्रतिभेची झलक पाहायला मिळाली.





‘वृद्धाश्रमातील माता-पिता’ या विषयावर सादर करण्यात आलेल्या नाटिकेने प्रेक्षकांच्या डोळ्यांत पाणी आणले. या सादरीकरणातून समाजाला एक सकारात्मक आणि भावनिक संदेश देण्यात आला.

प्रमुख पाहुणे शिवाजीराव कराड यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. सांस्कृतिक कार्यक्रमामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो तसेच कलेच्या माध्यमातून परंपरा जिवंत ठेवण्याचे कार्य घडते, असे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाचे आयोजन श्री क्षेत्र निरंजन संस्था एकनाथवाडीचे मठाधिपती ह.भ.प. संतोषजी महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमासाठी केंद्रप्रमुख बाळासाहेब पोळ, विविध शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक, गावचे सरपंच-उपसरपंच, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष-उपाध्यक्ष व सदस्य, सोसायटीचे चेअरमन-व्हाईस चेअरमन, आजी-माजी पदाधिकारी, ग्रामस्थ तसेच महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक भाऊसाहेब सुपेकर यांनी केले. सूत्रसंचालन बेग सर व काळे सर यांनी केले. तसेच शिक्षक रामदास आव्हाड, पुष्पलता खेडकर, संतोष भातोडे, संतोष गव्हाणे, अशोक खाडे व गणेश गोसावी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.एकूणच, जि.प. प्रा. शाळा एकनाथवाडीचा वार्षिक सांस्कृतिक सोहळा उत्साह, संस्कार आणि सामाजिक जाणीव यांचा सुंदर संगम ठरला

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077